लोकमत



विद्यापीठात रविवारी 'स्वराज्य आणि राज्यसंस्था', 'लोकमान्य आणि महात्मा' या पुस्तकांचे प्रकाशन डॉ. अशोक चौसाळकर व कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले यावेळी भारती पाटील, प्रमोद पाटील, विलास शिंदे उपस्थित होते.

# महात्मा गांधीजींच्या मूल्यांद्वारे राजकारणाचे शुद्धिकरण व्हावे

## चौसाळकर : विद्यापीठात विशेष व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महात्मा गांधी यांना अभिप्रेत मूल्यांच्या पायावर आजच्या राजकारणाचे शुद्धिकरण करण्यास प्रतिबद्ध व्हावे, हाच आजच्या दिवसाचा संदेश आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी रविवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

महात्मा गांधी यांची न्यायविषयक भूमिका सुस्पष्ट होती. आयुष्यात कितीही मोठे आमिष अगर सत्ताशक्ती हाती आली, तरीसुद्धा न्यायाने वागणे न सोडणारी माणसे त्यांना अभिप्रेत होती, असे डॉ. चौसाळकर यांनी सांगितले. प्रा. राम बापट लिखित 'स्वराज्य आणि राज्यसंस्था' आणि प्रा. भारती पाटील संपादित 'लोकमान्य आणि महात्मा' या पुस्तकांचे प्रकाशन यावेळी झाले. 'सत्याचे प्रयोग' या आत्मकथेच्या क्रमशः अभिवाचन ध्वनी-मालिकेचे अनावरण करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी मनोगत व्यक्त केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

04 OCT 2022

जनसंपर्क कक्ष
सकाळ. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कसबा बावडा : येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. व्ही. एन. शिंदे.

# विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत 'एनएसएस'चे मोठे योगदान

## डॉ. व्ही. एन. शिंदे : 'डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी'त कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन आहे. विद्यार्थ्यांची जडणघडण व व्यक्तिमत्त्व विकासात 'एनएसएस'चे मोठे योगदान असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित 'राष्ट्रीय सेवा योजना दिन' कार्यक्रमात ते बोलत होते.

राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागते. सामाजिक जाणीव अधिक समृद्ध होते, असे डॉ. शिंदे म्हणाले. राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्यात होणारे बदल याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. राहुल पाटील, डॉ. नवनीत सांगले, प्रा. संकेत शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे सुमारे १८५ स्वयंसेवक उपस्थित होते. प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख प्राचार्य डॉ. संतोष चेडे यांनी करून दिली. अधिष्ठाता डॉ. राजेंद्र रायकर यांनी आभार मानले. संकेत चौगले, सौरभ केसरकर, वैभव नगने, धनश्री बोडेकर, पूनम पाटील, अक्षता कवठेकर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी डी. वाय. पाटील संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष माजी गृह राज्यमंत्री सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

0 4 OCT 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण एमबीए रिक्त जागांसाठी पुन्हा प्रवेशपूर्व परीक्षा होणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) अभ्यासक्रमासाठी आतापर्यंत ३६० पैकी २०४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. उर्वरीत १५६ जागांसाठी १५ ऑक्टोबरपर्यंत पुन्हा एकदा प्रवेशपूर्व परीक्षा (एन्ट्रन्स) घेतली जाणार आहे.

दूरशिक्षणमधील एम. बी. ए. अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषदेच्या मान्यतेने सुरु केला आहे. ३६० प्रवेश क्षमता असून मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्टशन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम. बी. ए. (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येईल. तरी ज्या विध्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा आहे. त्यांना सोमवारी प्रत्येक्ष प्रत्यक्ष प्रवेश घेण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत १५ विद्यार्थ्यांनी सोमवारी प्रवेश घेतले. आता १५६ जागांसाठी प्रवेशपूर्व परीक्षा घेतली जाणार आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी ही परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.

लोकमत

# दुरुस्त यादीवर हरकतीसाठी उरले तीन दिवस

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट), विद्या परिषद या अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी दि. १४ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. त्यासाठीची दुरुस्त मतदार यादी शनिवारी प्रसिद्ध झाली. त्यावर हरकती, आक्षेप नोंदविण्याची मुदत गुरुवार (दि. ६) पर्यंत आहे. ही मुदत वाढविण्याची मागणी विद्यापीठ विकास मंचने केली होती. मात्र, विद्यापीठ नियमानुसार मुदतवाढ मिळणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दुरुस्त यादीत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ३६,३४३ पदवीधर मतदार पात्र ठरले आहेत. दुरुस्त यादीवर कुलगुरूंकडे हरकती, आक्षेप नोंदविण्यास ३ दिवस उरले आहेत. त्यानंतर अंतिम मतदार यादी १२ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार आहे.